# शिक्षण संजीवनी

एक परिपुर्ण डीजीटल व इंटरअॅक्टीव्ह साप्ताहिक...



## ज्ञानरचनावाद

### RHYMING WORDS

| | | | |
|---|---|---|---|
| **Cat** | **bat** | **hat** | **rat** |
| कॅट | बॅट | हॅट | रॅट |
| **Pen** | **ten** | **hen** | **den** |
| पेन | टेन | हेन | डेन |
| **Man** | **fan** | **van** | **pan** |
| मॅन | फॅन | व्हॅन | पॅन |
| **Pot** | **cot** | **not** | **dot** |
| पाॅट | काॅट | नाॅट | डाॅट |
| **Hut** | **cut** | **but** | **fut** |
| हट | कट | बट | फट |
| **Pin** | **tin** | **sin** | **win** |
| पिन | टिन | सिन | विन |
| **Day** | **may** | **say** | **ray** |
| डे | मे | से | रे |
| **Bed** | **red** | **wed** | **sed** |
| बेड | रेड | वेड | सेड |
| **Net** | **pet** | **let** | **wet** |
| नेट | पेट | लेट | वेट |
| **Boy** | **toy** | **Joy** | **soy** |
| बाॅय | टाॅय | जाॅय | साॅय |
| **Cry** | **fry** | **try** | **dry** |
| क्राॅय | फ्राय | ट्राय | ड्राय |
| **Sun** | **gun** | **run** | **fun** |
| सन | गन | रन | फन |
| **Cap** | **map** | **tap** | **lap** |
| कॅप | मॅप | टॅप | लॅप |
| **Bit** | **fit** | **hit** | **sit** |
| बिट | फिट | हिट | सिट |

### तोंडी बेरीज (सराव )

**तोंडी बेरीज अचूक करण्याची सवय लावण्यासाठी उपयुक्त .**

१० + १० = २० ■ १०० + १०० = २००
२० + १० = ३० ■ २०० + १०० = ३००
३० + १० = ४० ■ ३०० +१०० = ४००
२० + २० = ४० ■ २०० + २०० = ४००
४० + १० = ५० ■ ४०० + १०० = ५००
३०+ २० = ५० ■ ३०० + २०० = ५००
५० + १० = ६० ■ ५०० + १०० = ६००
४० + २० = ६० ■ ४०० + २०० = ६००
३० + ३० = ६० ■ ३०० + ३०० = ६००
६० + १० = ७० ■ ६०० + १०० = ७००
५० + २० = ७० ■ ५०० + २०० = ७००
४० + ३० = ७० ■ ४०० + ३०० = ७००
७० + १० = ८० ■ ७०० + १०० = ८००
६० + २० = ८० ■ ६०० + २०० = ८००
५० + ३० = ८० ■ ५०० + ३०० = ८००
४० + ४० = ८० ■ ४०० + ४०० = ८००
८० + १० = ९० ■ ८०० + १०० =९००
७० + २० = ९० ■ ७०० + २०० = ९००
६० + ३० = ९० ■ ६०० + ३०० = ९००
५० + ४० = ९० ■ ५०० + ४०० = ९००
९० + १० = १००■ ९००+१००= १०००
८० + २० = १००■ ८००+२००= १०००
७० + ३० = १००■ ७००+३००= १०००
६० + ४० = १००■ ६००+४०० = १०००
५० + ५० = १००■ ५००+५०० = १०००

## एक शब्दाच्या अक्षरापासून अनेक शब्द बनविणे

' समान ' या शब्दातील अक्षरे घेऊन पुढील सार्थक शब्द बनतात. मान, सन, मास, मानस, नस . खालील असे मूळ शब्द व त्यापासून बनविलेले सार्थक शब्द दिले आहेत.

**(१) तलवार --**

वाल, वार, वात, तर, तवा, रवा, तरल.

**(२) आठवडा --**

आठ, वडा, आठव, डाव, आव.

**(३) सरपण --**

सर, पण, सण, रण, रस, पसर.

**(४) गायरान --**

गाय, रान, गान, गारा.

**(५) यवतमाळ --**

माळ, तळ, तव, मात, माय, वय.

**(६) नवनीत --**

नव, वनी, वन, वतन, तन.

**(७) हवामान --**

हवा, मान, वान, नवा.

**(८) नागपूर --**

नाग, पूर, नार, गर , पू.

**(९) पसरट --**

पर , सर, पट, टर, रस, सट, पसर.

**(१०) वासरू --**

वास, सरू, वारू.

**(११) अहमदनगर --**

अहमद , नगर, नर , नग , मन, मदन,
मगर, दम, हरण, गरम.

**(१२) ताजमहाल --**

ताज, महाल, हाल, महा, ताल, जहाल,
लता, मल.

**(१३) महाभारत --**

महा, भारत, भार, मत, भात,
हात, मर, रहा.

**(१४) यशवंतराव --**

यश, यशवंत, राव, तवा, वरात, वंश,
रात, वय.

## याला काय म्हणतात ?

| प्रश्न | उत्तर |
|---|---|

(१) नारळाचे झाड -- माड .
(२) नारळाच्या फांद्या -- झावळी
(३) सिमेंट तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल -- चुनखडक.
(४) मीठ तयार करतात ते ठिकाण - मिठागर
(५) प्राणी पाळणे -- पशुपालन
(६) माणूस चंद्रावर गेला ते साधन -- अंतराळयान
(७) 'अश्म ' म्हणजे -- दगड
(८) जंगलातील मोठ्या प्रमाणातील आग -- वणवा
(९) थंडीत उबेसाठी पेटवतात -- शेकोटी
(१०) रुळावरून धावणारे वाहन - आगगाडी.
(११) पृथ्वीचा आकार -- गोल
(१२) तालुक्याला असेही म्हणतात -- तहसील
(१३) नदीचे काठ -- तीर / थडी.
(१४) खाणीतून काढलेले पदार्थ -- खनिज
(१५) माश्यांना असेही म्हणतात -- मासळी.
(१६) वनस्पतीचा जमिनीत वाढणारा भाग -- मूळ
(१७) उंचावरून पडणारा पाण्याचा प्रवाह -- धबधबा
(१८) किल्ल्याच्या सभोवतालची भिंत -- तट.
(१९) कैदी ठेवण्याची जागा -- तुरुंग
(२०) चार रस्ते एकत्र येतात ती जागा -- चौक
(२१) जमिनीखालील गुप्त मार्ग -- भुयार
(२२) जमिनीवर राहणारे प्राणी -- भूचर
(२३) जमिन व पाणी अशा दोन्ही ठिकाणी राहणारे प्राणी -- उभयचर
(२४) पाण्यात राहणारे प्राणी -- जलचर
(२५) दगडावर/दगडाच्या मूर्ती घडवणारा-- शिल्पकार
(२६) दगडावर कोरलेले लेख -- शिलालेख
(२७) तीन रस्ते एकत्र मिळतात ते ठिकाण - तिठा
(२८) न्यायनिवाडा करणारा -- न्यायाधीश
(२९) प्रचंड वेगाने वाहणारा वारा -- वादळ
(३०) सायकलच्या ट्युबमध्ये असणारा वायू पदार्थ -- हवा.

## खरेदी-विक्री /नफा -तोटा गणितीय माहिती

**(१) वस्तू विकत घेणे म्हणजे वस्तूची खरेदी करणे.**

**(२) वस्तू विकणे म्हणजे वस्तूची विक्री करणे.**

**(३) खरेदी किंमत पेक्षा विक्री किंमत जास्त असल्यास नफा झाला असे म्हणतात.**

**(४) खरेदी किंमत पेक्षा विक्री किंमत कमी असल्या तोटा झाला असे म्हणतात.**

---

- **खरेदी किंमत --**

एखादी वस्तू ठराविक किंमत/रक्कम देऊन विकत घेतात, त्या किमतीला खरेदी किंमत असे म्हणतात.

उदा. सुमितने १० रू. ला पेन विकत घेतला . १० रुपये ही पेनाची खरेदी किंमत.

---

- **विक्री किंमत --**

एखादी वस्तू ज्या किमतीत /रक्कमेत विकली जाते, त्या किमतीला विक्री किंमत असे म्हणतात.

उदा. दुकानदाराने वही १५ रू. ला विकली. १५ रूपये ही वहीची विक्री किंमत झाली.

---

- **नफा --**

जेव्हा एखाद्या व्यवहारात खरेदी किंमत विक्री किमतीपेक्षा कमी असते तेव्हा नफा झाला असे म्हणतात.

उदा. एक पेन १० रू. ला घेतला व १५ रू. ला विकला, तर ५ रुपये नफा झाला.

---

- **तोटा --**

एखाद्या व्यवहारात जेव्हा खरेदी किंमत विक्री किमतीपेक्षा जास्त असते, तेव्हा तोटा झाला असे म्हणतात.


उदा. १५ रु. ला घेतलेला पेन १० रूपयाला विकला तर ५ रूपये तोटा झाला .

---

**संकलन**
**शंकर सितराम चौरे**
**(प्रा.शिक्षक)**
जि.प. प्रा. शाळा बांडीकुहेर
ता.साक्री जि.धुळे
९४२२७३६७७५



# Tech कट्टा



**Zoom व्यतिरिक्त वापरता येणारी काही व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सॉफ्टवेअर**

**1) bigbluebutton.org**

दुर्गम विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिकवण्यासाठी व्यावसायिक उपाय शोधत आहात? बिगब्ल्यू बटण ऑडिओ, व्हिडिओ, स्लाइड, चॅट आणि स्क्रीनचे रीअल-टाइम सामायिकरण प्रदान करते. विद्यार्थी इमोजी चिन्ह सामायिक करणे, मतदान आणि ब्रेकआऊट रूममध्ये व्यस्त होतात.

**2) jitsi**

जितसी हा मुक्त-स्रोत प्रकल्पांचा एक संच आहे जो आपल्याला सुरक्षित व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सोल्यूशन्स सहजपणे तयार आणि उपयोजित करण्यास अनुमती देतो. जितसीच्या अगदी मध्यभागी जितसी व्हिडीओब्रिज आणि जितसी मीट आहेत, ज्यामुळे आपणास इंटरनेटवर कॉन्फरन्सन्स देता येतात, तर समाजातील इतर प्रकल्प ऑडिओ, डायल-इन, रेकॉर्डिंग आणि सिमुलकास्टिंग सारख्या इतर वैशिष्ट्यांना सक्षम करतात.

**3) ez talks**

ezTalks जगातील एक आघाडीची ऑनलाइन व्हिडिओ कॉन्फरन्सिंग प्रदाता आहे जी आपल्याला कोणत्याही वेळी आणि कोणत्याही वेळी लोकांशी संपर्क साधण्यास सक्षम करते. एचडी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, ऑडिओ कॉन्फरन्सिंग, स्क्रीन सामायिकरण, सामग्री सामायिकरण, रिमोट कंट्रोल आणि इतर सामर्थ्यवान वैशिष्ट्यांसह एकत्रित, सर्व उद्योगांवर (उद्यम, सरकार, शिक्षण, प्रशिक्षण, आरोग्य, कायदा, वित्त, सैन्य, समुदाय इ.) मोठ्या प्रमाणात लागू केले जाऊ शकते. .) ऑनलाइन मीटिंग / अध्यापन / प्रशिक्षण / वेबिनार / व्हिडिओ सादरीकरणासाठी

**4) uberconference**

आमचा समृद्ध इंटरफेस गोंगाट करणारा कॉलर नि:शब्द करणे, दुसर्या व्यक्तीस मिड कॉलमध्ये डायल-इन करणे यासारख्या गोष्टी करणे सुलभ करते.

सर्वात महत्वाचे update
Google meet हे app लवकरच फ्री access देणार.


**आनंद बालाजी आनेमवाड**
जि प शाळा मल्याण मराठी, डहाणू
9890797966




## शैक्षणिक न्यूज




### जगदंबानगर शाळेने लावला ऑनलाईन निकाल. जिल्ह्यातील एकमेव जिल्हा परिषद शाळा.

उमरगा तालुक्यातील कडदोरा येथील जगदंबानगर, जिल्हा परिषद शाळेने सन 2019-2020 या शैक्षणिक वर्षाचा निकाल महाराष्ट्र दिनादिवशीच ऑनलाईन लावण्यात आला आहे. सध्या जगात कोरोनाने थैमान घातले आहे. यामुळे शाळा बंद असून द्वितीय सत्र परीक्षासुद्धा रद्द करण्यात आली आहे. परंतु शासनाच्या वतीने निकाल कसा घोषित करायचा याचे स्पष्ट निर्देश देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र दिनानिमित्त होणारे ध्वजारोहणसुद्धा शाळेतील रद्द करण्यात आलेले आहे. अशात मुलांना प्रत्यक्ष निकाल देने शक्य होणार नाही म्हणून शाळेतील उपक्रमशील शिक्षक उमेश रघुनाथ खोसे यांनी शाळेची स्वतःची वेबसाईट बनविली व त्यावर मुलांचा ऑनलाईन निकाल जाहीर करण्यात आला आहे. जिल्ह्यातील एकमेव जिल्हा परिषद शाळा आहे ज्या शाळेने ऑनलाईन निकाल लावला आहे.

शाळेच्या शाळेला गावाचा आधार व गावाला शाळेचा अभिमान या वेबसाईटचे उदघाटन उस्मानाबाद डायटचे प्राचार्य डॉ.इब्राहिम नदाफ, शिक्षणाधिकारी शिवाजी जाधव, उपशिक्षणाधिकारी रोहिणी कुंभार, गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार साहेब, अधिव्याख्याता नारायण मुदगलवाड, विषयतज्ञ समाधान शिकेतोड, तानाजी खंडागळे केंद्रप्रमुख नंदकुमार चौधरी, शिला मुदगडे तसेच तालुक्यातील मोठ्या प्रमाणात शिक्षक, विद्यार्थी पालक व शिक्षणप्रेमी नागरिक यांच्या हस्ते करण्यात आले.

यासाठी महाराष्ट्र दिनादिवशीच सकाळी 10 वाजता मान्यवरांच्या हस्ते ऑनलाईन मीटिंग मध्ये व्हिडीओ शेअर करून व वेबसाईट उघडून याचे उदघाटन करण्यात आले. यावेळी सर्वांनी शाळेचे मुख्याध्यापक श्रीराम पुजारी व तंत्रस्नेही शिक्षक उमेश खोसे यांचे हा उपक्रम राबविल्याबद्दल कौतुक केले.

खोसे यांनी या वेबसाईटवर शाळेत राबवित असलेले उपक्रम तसेच विद्यार्थी व पालकांसाठी उपयुक्त माहिती व लिंक उपलब्ध आहेत असे सांगितले. तसेच इतरही उपयोगी साहित्य असल्याचे नमूद केले.

तसेच शाळेने या वेबसाईटच्या माध्यमातूनच सन 2020-2021चे प्रवेश सुरू करण्यात आलेले आहेत. ऑनलाईन प्रवेश पात्र विद्यार्थी माहिती संकलन व प्रवेश देण्याचे काम चालू करण्यात आलेले आहे. तसेच ऑनलाईन शिक्षणासाठी उपयुक्त माहिती या वेबसाईटवर उपलब्ध आहे. www.zppsjagdambanagar.blogspot.com हा वेबसाईटचा अड्रेस आहे. यावर भेट देऊन आपणही माहितीचा लाभ घेऊ शकता. ही वेबसाईट उपक्रमशील शिक्षक उमेश खोसे यांनी स्वतः बनविली आहे. जिल्हा परिषद शाळेची स्वतःची वेबसाईट आहे. तसेच ऑनलाईन मार्गदर्शन, ऑनलाईन निकाल तसेच इतरही नाविन्यपूर्ण उपक्रम शाळेत राबविले जात आहेत. जिल्ह्यात शाळेचा नावलौकिक उपक्रमशील शाळा म्हणून होत आहे.

## राज्यातील , पालक व विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे

सद्यस्थितीत राज्यात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शाळा व कनिष्ठ महाविद्यालये बंद आहेत. अशा वेळेस राज्यातील विद्यार्थ्यांसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे करिअर संदर्भात मोफत स्वरुपात मार्गदर्शन व समुपदेशन सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

यासाठी राज्यातील मार्गदर्शक व समुपदेशकांची http://www.maa.ac.in/IVGS_Counsellor_Services_Letter.pdf येथे उपलब्ध आहे. सदर यादीतील संबंधित शिक्षक समुपदेशकांना विद्यार्थी आपल्या समस्यांबाबत संपर्क साधू शकतात. याकरीता कोणत्याही प्रकारचे शुल्क लागणार नाही.

**दिनकर पाटील**
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे



## कलामंच



### देहाभोवती फिरते.....

देहाभोवती फिरते
श्वासांचे उरले नाते
गात्रांची होत खपाटी
भरडे भूकेस जाते
तो संथ येतसे वेगे
सांगावा घेऊन कोणी
दु:खाच्या नक्षीमधली
पून्हा घसरली लेणी
जाग सदा व्याकुळती
प्रहरा चिंतीत जाई
ही रात्र कशी अंधारी
काळाच्या कक्षेत नाही
भयाण भेसूर आली
स्वप्न पहाटी हाळी
भयभेदाने शिणली
कानांची नाजूक पाळी
एकांती किती निघाले
माणसांचे केवळ जत्थे
भुकेस घेऊन कोणी
कुणाचे गळले पत्ते
उत्थानाला सज्ज कशी
फुलून गेली अवनी
अन मर्त्याच्या सांगाती
कर्मगतीची कवनी
हास्य कुणी हे ओठी
खिंकाळून माझे नेले
उदास चेहरे सारे
व्याकुळ व्याकुळ झाले.

**- संदीप देशमुख गणोजेकर, अमरावती**
7620856265

## नाट्यक्षेत्र

पुणे महानगरपालिकेतील कोंढव्यातली माझी शाळा. अंतिम नाट्यप्रवेश स्पर्धेत मोठ्या गटात सहभाग घेतला. सातवीचा माझा वर्ग. नाटकात दहा पोरं. आठ माझ्या वर्गातली आणि दोन इतर वर्गातली. 'मुलगी झाली हो' या स्त्रीभ्रूण हत्येवर आधारित नाटकाचं लेखन केलं. नाटकाचे लेखन करण्याची ही माझी पहिलीच वेळ. मुलींचा जन्म आणि शिक्षण यांसाठी शालेय स्तरावर 'मुलगी झाली हो!' हा सामाजिक उपक्रम शाळेत याच मुलांसमवेत राबवला होता. २३०००/- रुपये जमवून शाळेतील २७ गरीब मुलींना आणि शालेय परीसरातील २ नवजात मुलींना साहित्य दिलं होतं. म्हणून मुलं नाटक करताना तो प्रसंग पुन्हा पुन्हा खराखुरा जगत होती. त्यामुळेच संवाद पाठ करणं किंवा लक्षात ठेवणं त्यांना अवघड गेलं नाही. सर्व मुलांना एकमेकांचे सगळे संवाद अगदी तोंडपाठ. एखादा मुलगा सरावासाठी आला नाही की इतरांपैकी कोणीही अनुपस्थिताची भूमिका मस्तपैकी साकार करी. सुबोध बनसोडे या विद्यार्थ्याला शिवरायांची भूमिका दिली.शरीरयष्टी बारीक पणआवाज करारी. ऐतिहासिक भाषेतील संवाद.पाठांतरासाठी वेळ तसा कमीच उरला होता. एके दिवशी सकाळच्या शाळेतील गायकवाड सरांना एक मुलगा शाळेतील कडुनिंबाच्या झाडाशी हातवारे करत संभाषण करताना दिसला.

त्यांनी माझ्या वर्गातील असल्याचे मला सांगितले. तो सुबोध होता. झाडाशी न बोलता तो नाटकातील संवाद झाडासमोर पुन्हा पुन्हा म्हणत होता. त्याची कामाप्रती निष्ठा पाहून मलाही आणखी हुरूप आला आणि विद्यार्थ्यांमध्ये अशी जिद्द निर्माण करू शकलो याचा सार्थ अभिमान वाटला.

सायली,नैतिक,संकेत, उत्कर्ष यांचा अभिनय तर हावभावयुक्त अगदी जिवंत देखावा पहावा असाच. धनश्री,रोहीत,प्रियंका,समर्थ चुकायचे पण सराव करायचे. नाटकातील पात्रांची निवड करताना 'सुहानी'ला नुकत्याच बाळाला जन्म दिलेल्या आईची भूमिका दिली. तिचे आई-वडील हडपसरला रहायला. ती इथे कोंढव्यात आजीसोबत मामाकडे रहायला. आईपासून दूर राहणारी सुहानी भारी भावनिक. म्हणून ही भूमिका तिला,एवढंच यामागचं प्रयोजन. संवाद अगदी मनापासून म्हणायची. पण आवाज अगदीच बारीक. ऐकूच यायचा नाही. खूप सराव झाला,ओरडणं झालं,रडारडही झाली. तरी आवाज काही खुलेना. दोन तीन दिवसांनी तिला रद्द करून वर्गातल्या दुसऱ्या मुलीला ती भूमिका सोपवली. सुहानी मुकपणे रडली फक्त. दुसऱ्या दिवशी शाळेत आलीच नाही. वर्गातल्या दोन तीन मुली जवळ येऊन म्हणाल्या,"सर आवाज मोठा यावा म्हणून ती रोज गरम पाणी आणायची प्यायला." ऐकून खूप वाईट वाटलं. सातवीतली चिमुरडी आपल्या भूमिकेला आकार देण्यासाठी इतके प्रयत्न करतेय याचं खरंखुरं कौतुक वाटलं. शाळेजवळच राहणाऱ्या सुहानीच्या घरी दोन पोरं पाठवून तिला बोलावून घेतले. सुहानी आली, डोळे लाल झाले होते. भरपूर रडून घेतलं असणार. माझीच मला किव आली. पुन्हा असा गुन्हा करणार नाही असं मनोमन ठरवलं. पोरीनं खूप सराव केला, आवाज मोठा येऊ लागला. 'काळजाला चटका लागावा इतका सुंदर अभिनय तिने स्पर्धेवेळी केला! नाटकात मुलगा तिला अन् वृद्ध पतीला घराबाहेर काढतो तेव्हा दोन दोन मुली गर्भात मारल्याचं प्रायश्चित्त करत ती चिमुरडी खरीखुरी रडली.. अंगावर काटा उभा राहिला. प्रेक्षकांनी कडाडून टाळ्या वाजवल्या.नाटकात प्रत्यक्ष सहभागी नसणारे स्वप्निल,नितेश,शरद,कार्तिक यांनी योग्य वेळी अचूक ध्वनी निर्माण केला. शाळेची बेल,घुंगरं वाजवणे ,विजेच्या कडकडाटासाठी मोबाईल जोडला. सगळं पोरांनी स्वतः केलं. यात पोटे सरांनी सहकार्य केलं. खाटपे मामांनी शुटींग केलं.आमचा अंतिम नाट्यप्रवेश स्पर्धेत द्वितीय क्रमांक आला.एका गुणाने प्रथम क्रमांक हुकला. त्याची आता फिकीर नव्हती. मुलं पट्टीचे कलाकार झाले होते,यातच पांग फिटलं. विजयाच्या जल्लोषात खूप धमाल केली. उड्या मारल्या. सहशिक्षक प्रविण

पोटे सरांनी कात्रज दूध डेअरी मध्ये सगळ्या पोरांना आईस्क्रीम व सुगंधी दूध घेतले,भारी वाटले. सुहानीसोबत सर्वांना शाबासकी दिली. या पोरांमुळेच माझ्याही कष्टाचं चीज झालं होतं. वर्ष संपेल, मुलं निघून जातील शाळेतून.पुढच्या स्पर्धेवेळी असे खरे कलाकार मिळतील का? या प्रश्नाच्या चक्रव्यूवहातच शाळेत आणून मुलांना सोडलं आणि मी निघालो परतीच्या प्रवासाला!!

https://youtu.be/KH3nkdLCyus

**आयुब कलाम शेख**
प्राथमिक शिक्षक
म.न.पा.शाळा क्र.१७४बी,
कोंढवा बुद्रुक पुणे-४८
मो.९५५२९४१२७१

## चित्र रंगवा

**चित्रावर क्लिक करा !**



अती भेटले तं भेटले....
"ओ पोरा... शांताराम चा पोरगा होयस काय रे ?"
"हाव.काय म्हनता ?"
"कुठी निगांला गाळी घिऊन ?"
"आकोटले."
"जमलं गळ्या...मले यीव देनं गाळीवर आकोटलोगू."
"रस्ता खराब हाय ना आबा...पळले- गिळले तं बसा लागन..नस्ती आफद मायाभवती ..."
"मी काय कच्च्या गुरूचा चेला हाव काय बे... अशा तं कितीक गाळेयीवर बसतो मी रोजचं..."
" पा बॉ...बसा मंग...धरुन ठेवजा पन..."
"जूनं खायेल हाव आमी... तूमच्या सारखं हूलू पूलू थोळीच हाव..."
"काय काम काळलं आबा आकोटले ?"
"बँकेत काम हाय."
"पैसे जमा करता काय ?"
"हे काय जमा कऱ्याचे दिवस हायत काय बे...माया पगार जमा झाला... तो काळ्याले चाललो."
"तूमी कोनत्या नवकरीवर होते की पगार जमा झाला तुमचा."
"तो निराधारचाना बे.हजार रुपये मयना."
"तूमाले तं तीन तीन पोरं हायत.तूमी कूठचे हो निराधार ?अन् तुमच्या जोळ तं बारा एक्कर वावर हाय...त मंग कसा काय भेटते हो तूमाले पगार."
"आता तूयापासून काय लपोवाव गळ्या... माया नातासारखा हायस तू... म्हणून सांगतो तूले... आईक.. हे पाय..चार चार एक्कर तिघईच्या नावानं करूण देलं...त्याच्यानं आमी बुडा बुडी पगार घ्याले मोकये...मंग येलाले दुःख ना वायकाले दुःख."
"वाहो आबा... लयच खतरा काम हाय हो तूमचं."
"अन् पाय गळ्या नातू... एका कामासाठी जायाले पूरते काय ? ते फूकटच्या सिलेंडरची सबसिळी जमा झाली म्हनतात... ते उजोला योजनेचं कनेक्शन घेल हाय ना म्या... तेई पैसे काळून घेतो संगमंग..."

"राजा आबा... तूमाले कसं काय जुगाळ जमते हो हे ?"


"हे पाय गळ्या...आपले सारे कामं नियमानं असतात. कागदाले कागद जूळला की झालं...एवळई करून नाईच ज्यमलं तं पैसा फेको तमाशा देखो..."
"बेजाच काराबीन मानूस हा राजा तूमी आबा... अन् काहो.. पर्वाच्या दिवशी काय आनलं थैल्या भरू भरू..."
"ते फूकटचे तांदूई वाटप होतं ना कन्टोलात...आनले मंग...मायाजोळ दंलिदंर रेसेचं कार्ड हाय ना... आता सरकारनं आपल्याचसाठी पाठोल्यावर कायले सोळ्याचे..."
"गरिबईचे फायदे तं तूमीच घिऊन रायले...सारं दाबनं सुरु हाय "
"मी गरिबच हाव.भूमिहीन नाई काय मी."
"काई बोलता बावा... बारा एकराचे मालक अन् भूमिहीन..."
"असं तू म्हनतं...गाव म्हनते... कागदं थोळीच म्हनतात."
"काहो आबा...त्या शंकरच्या घरी चकरा काऊन मारता हो तूमी..."
"तो सायाचा शंकऱ्या... दोन सालापासून माये पाच हजार रुपये दिऊनच नायी रायला अन् व्याजई नायी देलं ससरीच्यानं..."
"ऑ...काय सांगता... हेई धंदे करता काय ?"
"अळीअळचनीत कामा पळा लागते लोकईच्या... तेईचई भागते अन् आपलंई जमते..."
"तरी तूमाले फूकटचे तांदूई भेटतात... कमाल हाय राजा तूमची ?... कोनत्या पोराच्यात असता ? मजा असन बॉ तूमची तं..."
"बूडा बूडी अलग राह्यतो आमी.बरं झालं घरकूल भेटलं मले...योजना हायत अन् आमी... मंग कायचीच नई आमाले कमी... पन कितीकई करा...सायचेईले कायी नावच नयी..."
"मंग कायले एवळा कातोळा करता ?"
"नातईत लय जिव हाय ना माया... असं वाटते तेवळच करून ठेवाव तेईच्यासाठी..."
"खाना गरीबईच्या योजना अजून ...सरकारले चुना लाऊ लाऊ... करा चोरईचं धन ..."
"काय म्हणतं रे... मोठ्यानं बोल जरा..."
"कई नायी आबा...
तूमचं मन लय मोठं हाय म्हतलं..."
"हवं...ते तं हायच गळ्या...शेवटी काय संग येते..."
"आबा एखांदी गाळी घ्या ना हो..."
"काह्यले गाळी घ्या लागते बे...तूया सारखे लय भेटतात... दाखोला हात की नेतात बसून... अन् गाळी तं घिऊ पन् पेट्रोल...चाऱ्याची कोंबळी अन् बाऱ्याचा मसाला...इमर्जन्सीले ॲटो जिंदाबाद हायतच..."
"हे लॉकडाऊन सुरू होयाच्या पह्यले तं तूमी लयच खेप ॲटोत दिसले ? काय गरबळ होती ?"
"त्या झेडपीच्या बकरेईच्या स्किम साठी पंचायत समितीत अर्ज केलता... तेच गरबळ...जमते आपलं... कागदंपत्रईसयीत सारी सेंटीग लागली..."
"तूमचे लयच कनेक्शन हायत राज्या जिकळे तिकळे..."
"तूयई अशील कायी तं सांगजो... कोनत्याई योजनेचं काम पळो...मायाजोळ येजो..दिल जूगाळ बसून तूयं...."
"जरा गरिबईच्याई आंगी लागू द्या ना... निरा आपलच घोळं दमाटता काय ?"
"ते जाऊ दे... मले हे सांग की,हे लॉकडाऊन कधी उघळते ? मानसाले हिंड्यालेई नायी भेटून राह्यलं..."
"बातम्या पायत नसता काय....वाळलं आखिन ते...लोकईले जिवाची पळली अन् तूमाले हिंड्याची पळली...या वयात सोबते काय राजा...जाऊ द्या बावा.. कुठी उतरता हे सांगा पह्यले ?"
"त्या नाक्याजोळच्या बँकेपाशी... हे पाह्य...मायं घंटाभऱ्यातच होते...मले यीव देजो वापीस तूयासंग घरी.थांब थांब... उतरू दे मले...अतीच येजो मले घ्याले...नाईतं वाट पाह्याले लावशील..."
"हव...अती भेटले तं भेटले... वरते नका भेटू..."
"ऑ... काय म्हटलं... मोठ्यानं बोलं..."
"काई नाई... अतीच भेटजा म्हटलं..."

**चंद्रशेखर अ महाजन**
बळेगाव,अकोट जि.अकोला
9623238096

## AUDIO-VIDEO LABS

ऑडिओ ऐकण्यासाठी क्लिक करा.

**व्हिडिओ पाहण्यासाठी फोटो किंवा इमेज वर क्लिक करा.**















## ORIGAMI




1. Start with your paper coloured side up.

Fold in half, then in half again, as shown. Crease well, then open out again.




2. Turn the paper over and fold in half diagonally and in both directions. Crease well and open out once again.




3. Holding the points shown, bring them both down to the centre point on the bottom line.


Flatten model.




4. Fold bottom corners of top layer only to top point and unfold.
Repeat on back.
This is one module.



5. Make 5 more modules so you have 6 altogether.



6. To join modules, slip one set of "legs" into another set of legs, like so:



9. Continue to add modules to build the star, repeating steps 6-8 as you go.

Finished Modular Star.

**संकलन - श्याम कापसे**



२ मे १९२१ ख्यातनाम चित्रपट निर्माते व दिग्दर्शक आणि भारत रत्न तसेच विशेष ऑस्कर पुरस्कार विजेते सत्यजित रे यांचा जन्म.

**संपादक :-** आनंद आनेमवाड
**उपसंपादक:-** गोविंद सोनपिर
**सहसंपादक :-** भागवत केंद्रे
**मार्गदर्शक :-** संतोष भोंबळे
**तांत्रिक संपादक :-** श्याम कापसे

-----------------------------------------------

सदरील इ- साप्ताहिकातील माहितीशी संपादक व इतर सहकारी सहमत असतीलच असे नाही. हि माहिती वेगवेगळ्या माध्यमातून संकलित केलेली असून त्यानं एकत्रित आणून सदरील साप्ताहिक pdf रूपात प्रसिद्ध केलेले आहे.

-----------------------------------------------